यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
ज्ञानगंगा घरोघरी
कुसुमाग्रज अध्यासन



प्रा. डॉ. दिलीप धोंडगे,
प्रमुख

ई-मेल : kusumagraj.chair@ycmou.ac.in

दिनांक : १८-०२-२०२५

# विशाखा काव्य पुरस्कारासाठी कवितासंग्रह पाठवायचे आवाहन

विद्यापीठाचा कुसुमाग्रज अध्यासनाच्या वतीने नवोदित कवींच्या पहिल्या प्रकाशित काव्य संग्रहासाठी 'विशाखा काव्य पुरस्कार' देण्यात येतात. सन २०२४ मध्ये प्रकाशित झालेला नवोदित कवींचा पहिला काव्यसंग्रह 'विशाखा काव्य पुरस्कार - २०२४' साठी विचारात घेतला जाईल. यास्तव दि. ०१ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत प्रसिद्ध झालेला काव्यसंग्रह पाठवावा. सन २०२४ वर्षासाठी प्रथम, द्वितीय आणि तृतीय असे प्रत्येकी तीन पुरस्कार देण्यात येतील. पुरस्कारासाठी काव्यसंग्रह दि. ३१ मार्च २०२५ किंवा त्यापूर्वी विद्यापीठाला प्राप्त व्हायला हवेत.

## पुरस्कारासाठी नियमावली :

१. पुरस्कारासाठी कोणतेही प्रवेश शुल्क नाही.
२. कवितासंग्रह मराठी भाषेतच असावा.
३. पुरस्कारासाठी कवीचा फक्त **प्रथम प्रकाशित काव्यसंग्रहच** ग्राह्य धरण्यात येईल.
४. कविता संग्रहाची या आधी ई-आवृत्ती प्रकाशित झालेली नसावी.
५. कवितासंग्रह **दि.०१ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४** या कालावधीतच प्रकाशित झालेला असावा.
६. कवितासंग्रहावर प्रकाशन वर्ष ठळकपणे छापलेले असावे.
७. कवितासंग्रहाच्या ०५ प्रती पाठवणे आवश्यक.
८. स्पर्धकाने पाठवलेल्या काव्यसंग्रहाच्या प्रती परत पाठवल्या जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.
९. **कवीचा पहिला काव्यसंग्रह असल्याचे प्रतिज्ञापत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.** प्रतिज्ञापत्र जोडले नसल्यास काव्यसंग्रह विचारात घेतला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.
(प्रतिज्ञापत्राचा नमुना विद्यापीठाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.)
१०. पुरस्कारासाठी कवी स्वतः किंवा प्रकाशक काव्यसंग्रह पाठवू शकतात.
११. काव्यसंग्रहासोबत कवीचे पासपोर्ट आकाराचे २ फोटो आणि परिचयपत्र पाठवणे आवश्यक आहे. परिचयपत्रात कवीचा संपूर्ण पत्ता, ईमेल आयडी, भ्रमणध्वनी क्रमांक नमूद केलेला असावा.
१२. कवितासंग्रह पोस्टाने कुसुमाग्रज अध्यासनाच्या दिलेल्या पत्त्यावर पाठवावेत. खाजगी कुरियरने पाठवू नयेत. पाकिटावर 'विशाखा काव्य पुरस्कारासाठी' असा उल्लेख करावा.
१३. निवड समितीचा निर्णय अंतिम असेल.
१४. कवितासंग्रह पाठविण्याचा पत्ता :

**प्रमुख, कुसुमाग्रज अध्यासन,**
**ज्ञान स्रोत केंद्र इमारत, पहिला मजला,**
**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,**
**गोवर्धन, नाशिक - ४२२२२२**

**डॉ. दिलीप धोंडगे**
प्रमुख,
कुसुमाग्रज अध्यासन

**दि. / /२०२५**

# <u>प्रतिज्ञापत्र</u>

मी ______________________________ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा कुसुमाग्रज अध्यासनाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या **'विशाखा काव्य पुरस्कारासाठी'** असे प्रतिज्ञापत्र सादर करतो/करते की, ______________________ हा माझा कवितासंग्रह ________________ रोजी प्रकाशित झाला असून सदर काव्यसंग्रह हा माझा **प्रथम प्रकाशित काव्यसंग्रह** आहे. यापूर्वी माझा कोणताही काव्यसंग्रह प्रकाशित झालेला नाही.

वर दिलेली माहिती सत्य असून त्याबाबत मी स्वतः प्रतिज्ञापत्र लिहून देत आहे. वरील माहिती खोटी आढळल्यास माझा काव्यसंग्रह पुरस्कारासाठी बाद ठरेल याची मला खात्री आहे.

**आपला/आपली विश्वासू,**

______________________